बांधकाम मंजुरी प्रमाणपत्र

श्री दिलीप मामीडवार, दादाभाई नौरोजी वार्ड, बल्लारपूर

यांनी दि. 18.06.2013 रोजी परवानगी मिळणे करिता केलेला अर्ज

क्र. प्रशा/यो.वि./बांध. परवानगी/ ९८९७ /२०१३

कार्यालय नगर परिषद, बल्लारपूर

दिनांक : २८/०५/१३

नगर परिषद, बल्लारपूर

प्रारंभ प्रमाणपत्र

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 189 (4) व उपविधी अधिनियम 42 (7) अन्वये याद्वारे

श्री दिलीप दादाजी मामीडवार रा. दादाभाई नौरोजी वार्ड, बल्लारपूर

खंड क्रमांक ______ भूखंड क्र. 18/147, 169 शीट क्र. 10

बल्लारपूर नगरपालिकेच्या हद्दीतील तुमचे मालकीचे कब्जातील जागेत लाल रंगात नकाशात दुरुस्ती दर्शविल्याप्रमाणे दुकाने + सिनेमा हॉल इमारतीचे बांधकामास पुढील शर्तीस अधीन राहून बांधकामास परवानगी देण्यात येत आहे.

-: अटी :-

- आपले सदरहू बांधकाम कोळसा परिसरात आल्यास व पुढे त्यास कोल विभागाने वा शासनाने आक्षेप घेतल्यास त्यास ही नगर परिषद जबाबदार राहणार नाही.
- हे प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्ष वैध असेल, मात्र नगर रचना विभागाने सदरचे प्रमाणपत्रास हरकत घेतल्यास किंवा काही मार्ग दर्शविल्यास सदरचे प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे मानण्यात येईल.
- सदरहू बांधकामामुळे नगर पालिकेच्या विकास योजनेत अगर अन्य कोणत्याही सार्वजनिक कार्यात अडथडे निर्माण झाल्यास बांधकाम तुमचे खर्चाने काढुन घ्यावे लागेल. त्याबद्दल नुकसान भरपाई मिळणार नाही
- बांधकाम मंजुर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालुन दिलेल्या अटी प्रमाणे करावे.
- मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमचेवर राहील. तशी परवानगी घेतल्याशिवाय बांधकाम सुरु करु नये.
- भूखंडाचे बाजुचे हद्दीपासून आणि मागील बाजुने नकाशात दाखविलेप्रमाणे अंतर सोडावे.
- बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पुर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरहू बांधकाम परवानगी रद्द झाले असे समजण्यात यावे.
- ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे त्या जागेसंबंधी कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्या संबंधीची सर्व जबाबदारी तुमचेवर राहील.
- बांधकामाचे सामान सार्वजनिक रस्त्यावर नगर पालिकेच्या लेखी परवानगी शिवाय टाकु नये. तसे आढळून आल्यास कारवाई करण्यात येईल.
- भूखंडाच्या क्षेत्रापेक्षा जास्त जागेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
- रस्त्याचे सपाटीपासून इमारतीची प्लींथ (Plinth) 2 फुटापेक्षा कमी नसावी.

THE SUB-REGISTRAR, BALLARPUR

ब ल श		
५९८	९०	२२
२०१६		

12. बांधलेल्या जागेत भरपूर हवा, उजेड व स्वच्छता राहील अशा तऱ्हेची सोय असावी त्या बद्दलची योग्य ती खबरदारी घ्यावी.

13. बांधकाम पक्क्या स्वरुपाचे असावे. बांधकामामध्ये हलक्या जातीचे सामान गवत, पांगारा वगैरे वापरु नये.

14. ज्या जागेत इमारतीचा नकाशा मंजुर केला आहे त्या जागेत जनावरांचा गोठा बांधू नये

15. इमारतीचे पाणी इतरत्र न सोडता नगर पालिकेची गटार असल्यास नगर पालिकेचे गटारात नगर पालिकेची परवानगी घेवून सोडावी. गटार नसल्यास स्वतःचे मालकीचे जागेतच सोकपिट बांधून योग्य ती व्यवस्था करावी.

16. बांधलेल्या जागेचा उपयोग फक्त ~~रहिवासासाठीच~~, दुकानासाठीच, ~~कारखान्यासाठीच~~, ~~अन्य दळणाचे गिरणीसाठीच~~ करावा. (व टॉकीज)

17. हि बांधकामाची परवानगी एक वर्ष चालु राहील. बांधकाम पूर्ण न झाल्यास परवानगी मुदत वाढवून न घेतल्यास सदरची परवानगी रद्द झाली असे समजावे.

18. मंजुर नकाशाप्रमाणेच बांधकाम करावे. त्या व्यतिरिक्त जादा बांधकाम अथवा कोणतेही बदल केल्याचे निदर्शनास आल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 व महाराष्ट्र नगर पालिका नियम 1965 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

19. सदरहू भूखंडामध्ये कमीत कमी नविन दहा झाडे लावावी व सदर झाडे जतन करावी. त्याशिवाय बांधलेल्या जागेचा वापर करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

20. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर न. प. कडून "बांधकाम वापर प्रमाणपत्र" घेतल्याशिवाय बांधकामाचा वापर सुरु करु नये. तसे आढळून आल्यास महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम 1965 मधील तरतुदीनुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

21. कोणत्याही स्थितीत बांधकाम बंद करण्याचा अगर चालू करण्याचा अधिकार नगर पालिकेने राखून ठेवला आहे.

22. पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत निचरा होण्याकरिता आपण आपले जागेत कमीतकमी दोन Percolation Pits तयार करणे आपणावर बंधनकारक आहे व छतावरील पावसाचे पाणी जमिनीत निचरा होण्याकरिता Roof Rain Water Harvesting ची व्यवस्था करावी. याबाबत आवश्यक असल्यास नगर परिषदेचे मार्गदर्शन घ्यावे.

23. जोत्याचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नगर परिषदेला सुचना द्यावी. बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र नगर परिषद तर्फे घ्यावे. जोत्याचे बांधकाम नकाशाप्रमाणे नसल्यास बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

24. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2001/प्रक्र 410/2001/4 दि. 23 मे 2001 नुसार आपणास भारतीय मानक ब्युरोचे मानदंडाप्रमाणे घराचे बांधकाम भुकंपरोधक उपाययोजना करणे बंधनकारक राहील. तसेच यासाठी मान्यताप्राप्त अभियंता यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

25. बांधकामात फ्लॉय ॲशचे विटाचा वापर करणे बंधनकारक आहे.

वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यावर सदरची परवानगी रद्द करण्यात आलेली आहे असे समजण्यात येईल आणि परवानगी शिवाय बांधकाम करता येणार नाही.

२६. महाराष्ट्र सिनेमा नियम १९६६ चे पालन करणे बंधनकारक राहील.

ब ले श		
५९६	१८	२२
	१६	

ठिकाण : बल्लारपूर

दिनांक : 27/08/2003

मुख्य अधिकारी
नगर परिषद, बल्लारपूर

प्रतिलिपी : माहितीस सादर

१) मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर

२) मा. नगर रचनाकार, चंद्रपूर

सही/-
मुख्य अधिकारी
नगर परिषद, बल्लारपूर